IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES


APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-57

Special Issue of Department of Sociology,
Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

Date: 26 June 2021

# TRIBAL SOCIETY

## IN CONTEMPORARY INDIA : ISSUES , PROBLEMS & REMEDIES



**Chief Editor**
Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**
Dr. Shrinivas Pilgulwar
Head, Dept of Sociology

Book-1

Scanned with CamScanner

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

## Special Issue of Department of Sociology, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur

On

# TRIBAL SOCIETY IN CONTEMPORARY INDIA: ISSUES, PROBLEMS & REMEDIES

**Chief Editor**

Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**

Dr. Shrinivas Pilgulwar
Head, Department of Sociology

Scanned with CamScanner

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

**Index**

| SR. NO. | AUTHOR NAME | PAGE.NO. |
|---|---|---|
| 101 | नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार* | 605-614 |
| 102 | वनविषयक कायदे व आदिवासी<br>*डॉ. डी. जी. म्हशाखेत्री* | 615-620 |
| 103 | समकालीन भारतातील आदिवासी चळवळी<br>*डॉ. नागसेन नामदेव मेश्राम* | 621-629 |
| 104 | आदिवासी समाजातील लिंगभाव असमानता आणि आरोग्य प्रश्न<br>*डॉ कविता दि. मुनेश्वर* | 630-633 |
| 105 | आदिवासी समाजातील सामाजिक आंदोलने व परिवर्तन<br>*प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे* | 634-642 |
| 106 | आदिवासी समाजातील बालकामगारांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका)<br>*प्रा. डॉ. गजेंद्र माणिकराव कढव* | 643-650 |
| 107 | आदिवासींच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न<br>*प्रा. डॉ. दिपक एम. सुखदेवे* | 651-656 |
| 108 | आदिवासींची सामाजिक संरचना : प्रश्न आणि उपाय<br>*डॉ चंद्रकांत ध. कांबळे* | 657-666 |
| 109 | आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची समस्या<br>*डॉ विलास चव्हाण* | 667-670 |
| 110 | आदिवासी स्त्री समस्या<br>*प्रा. रीता द. वाळके* | 671-673 |
| 111 | आदिवासींचे कुपोषण – एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार* | 674-680 |

Scanned with CamScanner

# नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार

*समाजशास्त्र विभागप्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा*

*जि.चंद्रपूर मो.९८५०३८७२७६ ई मेल: snpilgulwar@gmail.com*

**गोषवारा**

*"१९८६ च्या काळात भारतात नवीन शैक्षणिक धोरणांची अमंलबजावणी करण्यात आली. देशात नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला तेंव्हा त्यासंबंधी आकाशवाणीवरून बोलतांना या खात्याचे केंद्रीय मंत्री आणि त्यानंतरच्या काळात भारताचे पंतप्रधान पद भुषविणारे श्री. व्हि. पी. नरसिंहराव यांनी सांगितले होते की, 'आदिवासींचा विकास झाला पाहिजे. सर्वसामान्य माणसाबरोबर त्यांना येण्याकरीता शासनाच्या विविध सोई–सुविधा या आदिवासींपर्यंत पोहचल्या पाहिजेत. त्यातच शिक्षण विषयक सोयी सुविधांचा समावेश होतो.' स्वातंत्र्यानंतर ३८ वर्षात आदिवासींसाठी शासनाने पुष्कळ काही केले, अद्यापही बरेच काही करावयाचे बाकी आहे. आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास व्हावयाचा असेल तर शिक्षण हे एकमेव रामबाण उपाय आहे. पंतप्रधानांना सर्वांचा विकास हा नविन शैक्षणिक धोरणात अभिप्रेत होता. त्यासाठी स्वत:च्या कामाशी प्रामाणिक राहून योजनांची अमंलबजावणी करणारे कार्येकर्ते शिक्षण क्षेत्रातही निर्माण होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाच्या आणि प्रगतीच्या संदर्भात जेव्हा आपण विचार करतो तेंव्हा तो आदिवासी विद्यार्थी जगाच्या खुपच मागे आहे हे लक्षात येते." (गिरधारी:२००३)*

***बीजशब्द:** भिल्ल जमात, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, शैक्षणिक प्रगती इ.*

## प्रस्तावना

"भारतीय स्मृती –ग्रथांत आदिवासी जमातीचा उल्लेख सापडतो. स्मृतीकाराने आदिवासीची निर्मिती ही अनुलोम –प्रतिलोम संकरातून निर्माण झाली असे म्हटले आहे. परंतू त्यातील शबर, रक्ष, निषाद, किरात यासारखे पूष्कळसे गट जाती नसून आदिवासी होते. त्यामूळे त्यांना हिन दर्जा प्राप्त झाला. रामायणात किरात, निषाद, शबर इ. आदिवासीचा उल्लेख आहे. बेटावर राहणारे, कच्चे मांस खाणारे व खाली मानवाचे व वर वाघाचे शरीर असणारे असा किरांताविषयीचा उल्लेख आहे. निषाद हे जंगलात राहणारे लोक होते असा उल्लेख आदिवासी लोकांविषयी आहे."(लाड:२०००) सर्वसाधारण समाजात आदिवासीबाबत औत्सुक्य असते. प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्त्रीयांचे जबरदस्तीने अपहरण करून त्यांच्याशी पासवी वर्तन करणारे, स्वच्छंद लैंगिक संबंध ठेवणारे, वाटेल ते भक्षण करणारे तसेच जादूटोण्यावर श्रध्दा ठेवणारे, उघडे नागडे लोक म्हणजे आदिवासी असा एक समज आहे. याऊलट निसर्गाशी तादात्म पावलेला स्वच्छंदी व स्वतंत्र वृत्तीचा आणि आधूनिक जगाच्या संपर्कामूळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासीचे जीवन सुखमय व अनूकरणीय आहे हा विचारही आदिवासी बद्दल पश्चिमी साहित्यात मांडण्यात आला आहे.

आदिवासी हे भारतातील आद्य वसाहतकार मानले जातात. हे लोक आत्मसंरक्षणास तितकेसे समर्थ नव्हते. त्यामूळे भारतात पश्चिम, वायव्य, ईशान्य या देशांकडून आलेल्या



Scanned with CamScanner

द्रविड, इंडोआर्यन व मंगोलीयन या लोकांपूढे त्यांचा टिकाव लागला नाही. बाहेरून भारतात आलेले हे लोक संख्येने अधिक नव्हते तर ते साधनसामग्रीने येथील एतद्देशीय लोकांपेक्षा वरचढ होते. त्यामूळे भारतीय आदिवासींचा टिकाव त्यांच्या पूढे लागणे शक्य नव्हते. यामूळे भारतातील वन्य जमातींना त्यांच्यापूढे हार खावी लागली. आपले जीवन व्यतीत करण्यासाठी डोंगरदऱ्यांचा किंवा जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. आजही ते बहुतांश प्रमाणात जंगलातच कायम वस्ती करून आपले जीवन व्यतीत करीत आहेत. अलिकडील काळात आदिवासी समाज वेग–वेगळ्या जमाती–पोटजमातीत विभागला आहे. त्यापैकीच एक भिल्ल ही जमात आहे.(जोशी:१९७५)

भिल्ल जमातीच्या लोकांची वस्ती प्रामूख्याने महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, मध्यभारत इ. भागात आढळतात. दूष्काळामध्ये काही भिल्ल सिंधमध्येही जाऊन राहीले आहेत. या जमातीचे लोक निरनिराळ्या राज्यात राहत असले तरी त्यांचे आचार–विचार, धर्म यामध्ये फारसा फरक आढळत नाही. भिल्लांच्या प्राचीन इतिहासाबद्दल फारसी लेखी माहीती उपलब्ध नाही. परंतू काही दंतकथा, ऐतिहासिक उल्लेख यावरून भिल्लांचा इतिहास शोधावा लागतो. मध्यपूर्वेतून आलेल्या प्रोटो–ऑस्ट्रेलॉईड लोकांचे भिल्ल, कोळी, शबर, हे वंशज होत असे मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे.(जाधव:१९७९) भिल्ल ही महाराष्ट्रातील ऐतिहासीक महत्व असणारी व संख्येने अधिक असणारी प्रमूख जमात आहे. महाराष्ट्रात 'सातपूडा प्रदेश' हा प्रामूख्याने भिल्लांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. सातपूडा पर्वतांच्या रांगामध्ये हा प्रदेश विखूरलेला आहे. गुजरात आणि मध्यप्रदेशातील पर्वतरांगाचा भाग सोडला तर सातपूडा पर्वतांच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद जिल्हयात पसरलेल्या आहेत. भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेली जमात म्हणून भिल्ल जमातीला ओळखले जाते. महाराष्ट्रातही भिल्लांची लोकसंख्या दहा लाखाच्या जवळपास आहे. (गारे:२००१)

नांदेड जिल्हयातील किनवट, माहूर, हिमायतनगर, हदगाव, भोकर या तालूक्यांमध्ये भिल्ल जमातीच्या लोकांची संख्या सर्वाधिक आहे. नांदेड जिल्हयातील भिल्लांना 'नाईकडा' या नावांनी सूध्दा संबोधले जाते. याचे मुख्य कारण म्हणजे नांदेडचा बराचसा भाग हा आंध्रप्रदेशाच्या सिमारेषेलगत आहे. आंध्रप्रदेशात भिल्लांना 'नाईकपोलू, नाईकपोड' या नावाने संबोधतात. याचाच अपभ्रंश होऊन 'नाईकडा' हा शब्द नांदेड जिल्हयातील भिल्लांसाठी रूढ झाला आहे. 'भिल्ल' हा शब्द संस्कृत भाषेतील 'भिल्ल' या शब्दाचे तद्‌भव रूप आहे. जे स्वंय संस्कृतमधील 'भिल्ल–बिल–भेदने' या धातूपासून मूलबध्द झाला आहे. भिल्लांच्या नावाचा उल्लेख इतिहासात इ. स. ६०० च्या सुमारास पहिल्यांदा केलेला आढळतो. 'विल्लु' किंवा 'बिल्लू' या तामिळी शब्दाचा 'धनूष्य' असा अर्थ होतो. म्हणजेच शिकारीसाठी 'धनूष्य' वापरणारे म्हणून भिल्ल हे नाव प्रचलित झाले आहे. प्रस्तूत शोध निबंधात नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

### ❖ पूर्व साहित्याचा आढावा

१. स. रा. गाडगीळ आणि इतर (१९८६): यांनी नांदेड जिल्हयाच्या ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांच्या संदर्भात सुक्ष्म आढावा प्रस्तूत ग्रंथात घेतला आहे. सदर ग्रंथातील १२ व्या प्रकरणात नांदेड जिल्हयातील भिल्ल आदिवासी जमातीच्या संदर्भात उपयूक्त माहीती दिली आहे. भिल्ल आदिवासी हे नांदेड जिल्हयातील भोकर, किनवट, हिमायतनगर हदगाव, माहूर इ. तालूक्यात बहूसंख्येने आढळतात ते शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्टया मागासलेले आहेत असे म्हटले आहे.

२. टी. बी. नाईक (१९६९): यांनी मध्यप्रदेशातील धार आणि झाबूआ जिल्हयातील भिल्ल जमातीवर शिक्षणाच्या झालेल्या परिणामाचा अभ्यास केला आहे. नाईक यांनी भिल्लांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करतांना भिल्लांच्या जमाती अंतर्गत स्थित असणाऱ्या शैक्षणिक असमानतेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नाईक यांच्या मते, भिल्ल जमातीमध्ये जमाती अंतर्गत शैक्षणिक असमानताही मोठया प्रमाणात आहे.

३. जी. नाम्बिझान (१९८३): यांनी राजस्थान मधील भिल्ल जमातीत अस्तीत्वात असलेल्या शैक्षणिक असमानतेचा अभ्यास केला आहे. नाम्बिझान यांना भिल्ल जमातीतील शैक्षणिक आणि व्यावसायिक अस्थिरता यामधील पारंपारिक संबंध यावर आपल्या अध्ययनात अधिक भर दिला आहे. नाम्बिझान यांच्या मते, भिल्ल जमातीच्या वेग–वेगळया वर्गात शैक्षणिक असमानता अस्तीत्वात आहे. भिल्ल जमातीत शैक्षणिक असमानता दिसून येण्यामागचे मुख्य कारण म्हणजे त्यांची आर्थिक परिस्थिती हे आहे. आर्थिकदृष्टया जूजबी परिस्थिती असणाऱ्या भिल्ल जमातीच्या मूलांचे शाळेतील प्रवेशाचे प्रमाण व त्यांची शैक्षणिक प्रगती अत्यल्प आढळून आली आहे.

### ❖ अध्ययनाचे उद्देश

१. भारतातील आदिवासी विदयार्थ्यांच्या शालेय शिक्षणातील प्रगतीचा आढावा जाणून घेणे.

२. भिल्ल जमातीतील शालेय स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा अभ्यास करणे.

३. भिल्ल जमातीतील विदयार्थ्यांच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रगतीचा अभ्यास करणे.

### ❖ गृहितकृत्य

१. भारतातील आदिवासी विदयार्थ्यांच्या शालेय शिक्षणातील प्रगतीची गती मंद आहे.

२. भिल्ल जमातीतील शालेय स्तरावर शिक्षण घेणाऱ्या व उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नाही.

### ❖ अभ्यासाचे महत्व

मानवाच्या व्यक्तिगत व सामाजिक विकासात शिक्षणाची भूमिका ही अत्यंत महत्वपूर्ण आहे. मानवाच्या सर्वांगीन विकासाचे सर्वाधीक प्रभावी साधन म्हणून शिक्षण या घटकांचा



Scanned with CamScanner

विचार केला जातो. प्रस्तूत शोध निबंधासाठी "नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय निवडण्याचे कारण म्हणजे नांदेड जिल्हयात भिल्ल जमातीच्या लोकांची संख्या लक्षणीय असून लोकसंख्येच्या प्रमाणात जमातीत शिक्षित लोकांचे प्रमाण हे नगण्य आहे. या जमातीतील लोक शिक्षणापासुन वंचित राहिल्यामुळे त्यांच्या विकासात अनेक अडथळे येत आहेत. ते विकासापासून वंचित राहू नयेत. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या मंद गतीची जाणीव शासन व समाजाला व्हावी आणि त्यांच्या विकासाच्या मार्गाला हातभार या अध्ययनाच्या माध्यमातून लागावा हेच महत्व प्रस्तुत अध्ययनाचे आहे.

### ❖ अध्ययन पध्दती

प्रस्तूत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात आला आहे. "वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समूह समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे वैशिष्टयांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तूत करणे हा आहे. या संशोधन आराखडयाच्या आधार विश्वसनीय तत्व व वास्तविकता हा असतो. अशा आधारावरच तत्व व माहितीचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून प्राप्त नवीन माहितीचे अर्थनिरूपण केले जाते. अशा प्रक्रियेलाच वर्णनात्मक विश्लेषण असे संबोधले जाते."(कऱ्हाडे:२०११) प्रस्तूत शोध निबंधासाठी प्राथमिक व व्दितीयक तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची, निरिक्षण या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. दुय्यम तथ्य संकलनात अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित–अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इतर संशोधकांचे संशोधन इ. आधार घेण्यात आला आहे.

### ❖ अध्ययन विश्व

प्रस्तूत शोध निबंधाच्या संशोधनासाठी नांदेड जिल्हा हे अध्ययनाचे विश्व आहे. नांदेड जिल्हयातील एकूण १६ तालूक्यांपैकी भिल्ल जमातींच्या लोकांची लक्षणीय संख्या असलेल्या भोकर, हिमायतनगर, हदगाव, व किनवट इ. तालूक्यांची निवड करण्यात आली आहे. या तालूक्यातील ४ गावातील २०० कुटुंबाचा अभ्यास करण्यात आला आहे. म्हणजे प्रत्येक गावातील ५० कुटुंबाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये भोकरमधील थेरबन, हिमायतनगर तालूक्यातील पवना, हदगाव तालूक्यातील आनंदवाडी व किनवट तालूक्यातील परोटी, या गावांचा अभ्यास करण्यात आला आहे. या २०० कुटुंबाची नमूना निवड म्हणून निवड ही सहेतूक पध्दतीने करण्यात आली आहे.

### ❖ तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन

व्यक्तीच्या बौध्दीक, मानसिक व सांस्कृतिक विकासाला चालना देणारे ज्ञान ते शिक्षण होय अशी शिक्षण शब्दाची व्यापक अर्थाने व्याख्या करता येईल. एखादी व्यक्ती विदयार्थी दशेत गुरूकडून जे ज्ञान मिळवते ते शिक्षण होय अशी शिक्षणाची संकूचित अर्थाने

व्याख्या होईल. तसे पाहिले तर माणूस हा जन्मभर शिक्षण घेतच असतो. शिक्षणामूळे माणसाला जीवनात यशस्वी वाटचाल करता येते. एक माणूस दूसऱ्या माणसापेक्षा श्रेष्ठ ठरतो. श्रेष्ठ ठरणाऱ्या माणसाची मन आणि बूध्दी ही शिक्षणाने प्रगत व विकसित झालेली असते. (जोशी:१९७५) शिक्षण या शब्दाचा अर्थ अधिक व्यापक अर्थाने घेतला जातो. शिक्षण हा शब्द इंग्रजीतील 'म्कनबंजपवद' या शब्दाचा मराठी भाषेतील रूपांतर आहे. 'म्कनबंजपवद' या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील 'म्कनबंतम' या शब्दापासून झाली आहे. ज्याचा मराठी भाषेतील अर्थ "पालनपोषण करणे असा आहे." याचाच अर्थ असा की, शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे ज्याच्या माध्यमातून व्यक्तीचे मानसिक आणि शारीरिक पालन पोषण केले जाते. शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासाचे व प्रगतीचे महत्वाचे साधन मानले जाते.

नांदेड जिल्हयातील भिल्ल ही जमात प्रोटो—ऑस्ट्रेलॉईड वंशाची आहे. भिल्ल जमातीच्या लोकांचा वर्ण काळसर लांबट व गोल डोके, चपटे व बोटके नाक, गोल उभट चेहरा, मध्यम उंची, मजबूत शरीर बांधा अशी भिल्ल जमातींच्या लोकांची शारीरिक वैशिष्ट्यै आहेत. नांदेड जिल्हयातील भिल्ल जमात शैक्षणिक दृष्टया जिल्हयातील इतर जमातीपेक्षा अतिशय मागास आहे. नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या लोकांचे साक्षरतेचे प्रमाण सदयस्थितीत १०टक्क्याच्या आसपास आहे. म्हणजेच जिल्हयातील निरक्षर आदिवासींची संख्या मोठया प्रमाणावर आहे. त्यातही भिल्ल जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची स्थिती अतिशय विदारक आहे. अशा शैक्षणिक दृष्टया कमालीचे मागासलेपण असणाऱ्या नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीच्या संदर्भात समाजशास्त्रीय अध्ययन प्रस्तूत शोध निबंधात करण्यात आले आहे.

भारतातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी किंवा प्रगतीसाठी स्वातंत्र्योत्तर काळात अनेक कार्यक्रम आखून शासनाने केंद्र व राज्य पातळीवरून आदिवासींचा शैक्षणिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारतात आदिवासी समाजात शिक्षित किंवा साक्षर व्यक्तीचे प्रमाण फार अत्यल्प होते. स्वातंत्र्यापूर्वी आदिवासी आणि शिक्षण यांचा सहसंबंध नव्हता. आदिवासी समाजात फार थोडे लोक केवळ साक्षर होते. आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीच्या संदर्भात ठक्कर बाप्पा सारख्या समाज सुधारकांनी मोठे काम केले आहे. आदिवासींची शैक्षणिक प्रगती व्हावी, त्यांनाही समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घ्यावे, देशाच्या प्रगतीत त्यांचाही हातभार असावा. अशी भुमिका सत्तेवर येणाऱ्या देशाच्या प्रत्येक पंतप्रधानानी वेळोवेळी मांडली आहे. याचा परिणाम म्हणून देशाच्या नियोजन आयोगाने प्रत्येक पंचवार्षीक योजनेत आदिवासींच्या शैक्षणिक योजनांकरिता विकास निधीची तरतूद करून त्यांची प्रगती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. शासनाच्या योजनांचा परिणाम म्हणून आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीला चालना कशी मिळत गेली ते खालील सारणीवरून आपल्याला अधिक चांगल्या रितीने स्पष्ट करता येईल.



Scanned with CamScanner

**सारणी क्र. १. भारतातील आदिवासींची शालेय शिक्षणातील प्रवेशित वर्गातील विदयार्थ्यांची माहिती दर्शविणारी सारणी**
**(आकडेवारी लाखात)**

| वर्श | प्राथमिक वर्ग १ ते ५ | | | उच्च प्राथमिक वर्ग ६ ते ८ | | | माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्ग ९ ते १२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलं | मुली | एकुण | मुलं | मुली | एकुण | मुलं | मुली | एकुण |
| २००५—०६ | ७५ | ६७ | १४२ | २५ | २० | ४५ | १३ | ०९ | २२ |
| २००६—०७ | ७६ | ६८ | १४४ | २६ | २० | ४६ | १५ | १० | २५ |
| २००७—०८ | ७६ | ७० | १४६ | २६ | २१ | ४७ | १४ | १० | २४ |
| २००८—०९ | ७९ | ७३ | १५२ | २७ | २३ | ५० | १६ | ११ | २७ |
| २००९—१० | ७९ | ७३ | १५२ | २८ | २३ | ५१ | १७ | १३ | ३० |
| २०१०—११ | ७७ | ७२ | १४९ | २८ | २६ | ५४ | १८ | १४ | ३२ |

*(Source: Educational Statistics at a Glance, 2012, MHRD)*

उपरोक्त सारणीतील आकडेवारी वरून देशातील आदिवासींच्या शालेय शिक्षणातील प्रवेशाची स्थिती लक्षात येते. सारणीतील आकडेवारी लाखात असून सारणीत २००५—०६ ते २०१०—११ या सहा वर्षातील विदयार्थ्यांच्या प्रवेशाचा आढावा घेण्यात आला आहे. सत्र २००५—०६ मध्ये प्राथमिक विदयार्थ्यांच्या प्रवेशाची स्थिती पाहता ७५ लाख मूलं, ६७ लाख मूली म्हणजे एकूण १४२ लाख विदयार्थी प्राथमिक शिक्षणात प्रवेशित होते. तर २०१०—११ मध्ये प्राथमिक शिक्षणातील प्रवेशाची स्थिती ही मूल ७७ लाख व मूली ७२ लाख म्हणजे एकूण १४९ लाख विदयार्थी प्रवेशित होते. या आकडेवारीची तूलना केली असता असे निदर्शनास येते की. प्राथमिक शिक्षणातील आदिवासी विदयार्थ्यांची प्रगती ही सकारात्मक असली तरी त्या प्रगतीचा वेग मात्र आपणास मंद दिसून येतो. तसेच उपरोक्त सारणीचे आणखी काही विश्लेषण प्राथमिक स्वरावरील शिक्षणाचे केले असता असे निदर्शनास येते की, सत्र २००८—०९ व सत्र २००९—१० मध्ये प्राथमिक स्वरावरील प्रवेशित विदयार्थ्यांची आकडेवारी जवळपास सारखीच आहे.जे की नैसर्गिकपणे जी वाढ व्हायला पाहीजे होती ती आपणास दिसून येत नाही.

उपरोक्त सारणीतील दूसऱ्या भागाचे विश्लेषण करतांना आपणास असे निदर्शनास येते की, उच्च प्राथमिक स्वरावरील विदयार्थ्यांच्या प्रवेशित आकडेवारीची तूलना केली असता असे निदर्शनास येते की, इयत्ता ६वी ते ८वी या वर्गात सत्र २००५—०६ मध्ये प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या ४५ लाख होती तर सत्र २०१०—११ मध्ये याच वर्गातील प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या वाढून ती ५४ लाख झाला आहे. म्हणजे या स्तरातील विदयार्थ्यांच्या प्रवेशाचे प्रमाण दरवर्षी थोडयाफार प्रमाणात का होईना वाढत गेले आहे. म्हणजचे भारतातील आदिवासी विदयार्थ्यांची या स्तरातील शैक्षणिक प्रगती आपणास सकारात्मक दिसून आली आहे.



Scanned with CamScanner

उपरोक्त सारणीच्या तीसऱ्या भागाचे विश्लेषण केले असता माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९वी ते १२ वी) स्तरातील भारतातील आदिवासी समूदायाच्या विदयार्थ्यांचे प्रवेशाची स्थिती ही सारणीत जी दर्शविण्यात आली आहे. त्या आकडेवारीचे विश्लेषण करतांना आपणास असे निदर्शनास येते की, सत्र २००५—०६ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक स्वरावरील विद्यार्थ्यांची सकल भारतात प्रवेशाची संख्या ही २२ लाख होती त्यात सत्र २०१०—११ मध्ये वाढ होऊन ३२ लाख झाली आहे. म्हणजचे ६ वर्षात जवळपास ४५ टक्के विदयार्थ्यांचे प्रवेशाचे प्रमाण वाढले आहे. एकूणच उपरोक्त सारणीच्या विश्लेषणातून असा निष्कर्ष स्पष्ट होतो की, भारतातील आदिवासी विदयार्थ्यांची प्राथमिक स्वरावरील शैक्षणिक प्रगतीची गती मंद आहे. व शैक्षणिक प्रवेशाचे प्रमाण ही म्हणावे तसे वाढत नाही. तर उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्वरावरील विदयार्थ्यांची शैक्षणिक प्रगती सकारात्मक आहे.

**सारणी क्र. २. भिल्ल जमातीच्या कुटुंबातील पाल्यांचा शालेय शिक्षणातील प्रवेशित विदयार्थ्यांची माहिती दर्शविणारी सारणी**

**(एकूण २०० कुटूंब)**

| अ.क्र. | शालेय शिक्षणातील वर्गनिहाय प्रवेशित विद्यार्थी | मुलं | मुली | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अ | प्राथमिक (वर्ग १ ते ५) | ५५ | ३३ | ८८ | ४४: |
| ब | उच्च प्राथमिक (वर्ग ६ ते ८) | २६ | १३ | ३९ | १९.५०: |
| क | माध्यमिक (वर्ग ९ ते १०) | २४ | १३ | ३७ | १८.५०: |
| ड | उच्च माध्यमिक (वर्ग ११ ते १२) | | | | |
| १ | कला | १२ | ११ | २३ | ११.५०: |
| २ | वाणिज्य | ०० | ०० | ०० | ००: |
| ३ | विज्ञान | ०६ | ०३ | ०९ | ४.५: |
| ४ | व्यावसायिक | ०४ | ०० | ०४ | ०२: |
| | एकूण | १२७ | ७३ | २०० | १००: |

नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन केले असता. क्षेत्रीय अध्ययनाव्दारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण उपरोक्त सारणीमध्ये करण्यात आले असून भिल्ल जमातीच्या २०० कुटुंबातील शिक्षणयोग्य वय असणारी एकूण ३५७ मुले व मुली आढळून आले असून त्यापैकी २०० मुले व मुली वेग—वेगळया शालेय शिक्षणातील वर्गात प्रवेशित असलेली आढळून आली आहेत. त्याचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षणात (१ ते ५वर्गात) ८८(४४टक्के) मुले उच्च प्राथमिक (वर्ग ६ते ८) शाळेतील प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या ३९(१९.५०टक्के) एवढी आहे. माध्यमिक वर्गातील (वर्ग ९ते १०) प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या ३७(१८.५०टक्के) एवढी आहे. तर उच्च माध्यमिक वर्गातील (वर्ग ११ते १२) यातील प्रवेशाची स्थिती पाहता कला शाखेत सर्वाधिक जास्त २३(११.५०टक्के) विदयार्थी प्रवेशित आहेत. त्यानंतर वाणिज्य शाखेत एकही पाल्य प्रवेशित नाही. विज्ञान शाखेत एकूण ९(४.५टक्के) प्रवेशित आहेत. तर व्यावसायिक शाखेमध्ये जमातीतील प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या ०४(२टक्के) आढळून आली आहे.



Scanned with CamScanner

भिल्ल जमातीच्या एकूण २०० कुटुंबापैकी वय वर्ष ६ ते २५ असणाऱ्या मुला मुलींची संख्या जमातीत ३५७ आढळून आली आहे. त्यापैकी जे २०० विदयार्थी आहेत. त्यांच्या वारंवारितेवरूनच सारणीतील टक्केवारी काढण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील चारही गावात पूर्व प्राथमिक शाळेची व्यवस्था असल्यामूळे गावातील शाळेत प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक जास्त आहे. अध्ययन क्षेत्रातील दोन गावात वर्ग १ ते ८ पर्यंत शिक्षणाची सोय असल्यामूळे भिल्ल जमातीतील पालक आपल्या मुलांना गावातील शाळेतच प्रवेश देण्यास प्राधान्य देतात असे आढळून आले आहे. माध्यमिक वर्गातील प्रवेशित विदयार्थ्यांचे प्रमाण प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गातील विदयार्थ्यांपेक्षा कमी दिसून आले आहे. त्याचे कारण शैक्षणिक गळती हे आहे. शैक्षणिक गळतीचे प्रमाण माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर अधिक दिसून आले आहे. कारण काही पालक आपल्या मूलांना गावात जेवढी शिक्षणाची सोय आहे तेवढेच शिक्षण प्राप्त करू देतात. काही पालक शेती कामासाठी, मजूरीसाठी मूलांना कामाला लावतात. काही पालक आपल्या मूलींना शेतातील कामासाठी, घरकामासाठी, व मूलींना बाहेरगावी दररोज जाण्या येण्याची सुविधा नसल्यामुळे आपल्या पाल्यांना पूढील शिक्षणासाठी पाठवत नाहीत. उच्च माध्यमिक स्तरावरील प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या कला शाखेत सर्वाधिक २३ असून त्यानंतर विज्ञान शाखेत ९ विदयार्थी प्रवेशित असलेले आढळून आले आहेत. व्यावसायिक शाखेत ४ विदयार्थी तर वाणिज्य शाखेत एकही विदयार्थी प्रवेशित नाही. थोडक्यात वरील निर्वचनावरून असा निष्कर्ष निघतो की, भिल्ल जमातीत शालेय स्वरावरील प्रवेशित विदयार्थ्यांचे प्रमाण फारसे अधिक चांगले नाही. जमातीतील शिक्षण प्राप्त करण्यास पात्र असणाऱ्या ३५७ जणांपैकी २०० जण शालेय शिक्षण घेत आहेत. म्हणजेच ५६ टक्के विदयार्थी शालेय शिक्षणात प्रवेशित आहेत.

**सारणी क्र.३. भिल्ल जमातीच्या कुटुंबातील पाल्यांची उच्च शिक्षणात प्रवेशित वर्गातील माहिती दर्शविणारी सारणी**

**(एकूण कुटुंब २००)**

| अ.क्र. | उच्च शिक्षणातील वर्गनिहाय प्रवेशित विद्यार्थी | मुलं | मुली | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अ | पदवी | | | | |
| १ | कला | ०६ | ०१ | ०७ | ३.७५: |
| २ | वाणिज्य | ०० | ०० | ०० | ००: |
| ३ | विज्ञान | ०३ | ०१ | ०४ | २: |
| ४ | व्यावसायिक | ०१ | ०० | ०१ | ०.५०: |
| ब | पदव्यूत्तर पदवी | | | | |
| १ | कला | ०२ | ०१ | ०३ | १.५०: |
| २ | वाणिज्य | ०० | ०० | ०० | ००: |
| ३ | विज्ञान | ०० | ०० | ०० | ००: |
| ४ | व्यावसायिक | ०१ | ०० | ०१ | ०.५०: |
| क | कुटूंबात कोणीच उच्च शिक्षणासाठी प्रवेशित नाही | | | १८४ | ९२.००: |

उपरोक्त सारणीत भिल्लांच्या शैक्षणिक प्रगतीच्या संदर्भात अध्ययन करतांना उच्च शिक्षणातील प्रवेशित विदयार्थ्यांच्या स्थितीचा आढावा प्रस्तूत शोध निबंधात घेण्यात आला



Scanned with CamScanner

आहे. भिल्ल जमातीच्या कुटुंबातील किती पाल्य सद्यस्थितीत उच्च शिक्षण घेत आहेत हे जाणून घेण्यासाठी उपरोक्त सारणीत संकलित तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. भिल्लांच्या २०० कुटुंबापैकी वेग—वेगळया शाखांमध्ये पद्वीचे शिक्षण प्राप्त करण्यासाठी प्रवेश घेणाऱ्यामध्ये कला शाखेत शिक्षण घेणारे ६ मुले व एक मुलगी एकूण ०७ विदयार्थी आहेत. वाणिज्य शाखेत अध्ययन क्षेत्रातील चारही गावातील एकही विदयार्थी पद्वीच्या शिक्षणासाठी प्रवेशित नाही. विज्ञान शाखेत ३ मुले व ०१ मुलगी असे एकूण ४ विदयार्थी शिक्षण घेत आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या केवळ ०१ आहे. अध्ययन क्षेत्र गाव असणाऱ्या परोटी या गावातील एकमेव विदयार्थी बी. सी. ए. च्या पद्वीचे शिक्षण घेत आहे.

पद्व्यूत्तर पद्वीचे शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांचे प्रमाणही भिल्ल जमातीत अतिशय कमी आहे. कला शाखेत पद्व्यूत्तर पद्वीचे शिक्षण घेणारे विदयार्थी अध्ययन क्षेत्रातील चार गावांमध्ये ०३ विदयार्थी आढळून आले आहे. त्यात २ मुले व ०१ मुलगी आहे. थेरबन येथे ०२ विदयार्थी पद्व्यूत्तर पद्वीचे शिक्षण घेत आहेत. ते या गावातील जमातीतील पहिले पद्व्यूत्तर पद्वीचे शिक्षण प्राप्त करणारे विदयार्थी आहेत. ०१ विदयार्थी पवना या गावातील पद्व्यूत्तर पद्वीचे शिक्षण प्राप्त करीत आहे. वाणिज्य आणि विज्ञान शाखेत पद्व्यूत्तर पद्वीच्या शिक्षणासाठी एक ही विदयार्थी अध्ययन क्षेत्रातील चारही गावातून प्रवेशित नाही. पद्व्यूत्तर पद्वीच्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आनंदवाडी या गावातून केवळ ०१ विदयार्थी प्रवेशित झालेला आढळून आलेला आहे. नांदेड जिल्हयातील अध्ययन क्षेत्रातील चार गावातील २०० कुटुंबापैकी १८४ कुटुंबात कोणीही व्यक्ती उच्च शिक्षणासाठी प्रवेशित नाहीत. वरील विवेचनावरून हे स्पष्टपणे दिसून येते की, स्वातंत्र्याच्या ६९ वर्षानंतरही भारतातील सर्वाधीक लोकसंख्या असणाऱ्या जमातीत उच्च शिक्षणाची दयनीय अवस्था आहे. भिल्लांमध्ये उच्च शिक्षणाची एवढी दुर्दशा असण्याचे कारण म्हणजे शिक्षणाविषयीची जाणीव आणि जागृतीचा अभाव आजही त्यांच्यात आढळून येतो. उपरोक्त विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की, भिल्ल जमातीतील उच्च शिक्षणातील शैक्षणिक प्रगती अतिशय बिकट आहे. समग्र भारतातील उच्च शिक्षणाचा २० टक्के च्या जवळपास असतांना भिल्ल जमातीत ते प्रमाण केवळ ४ टक्के असणे हे भिल्ल जमातीतील व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे.

### ❖ अध्ययनाचे निष्कर्ष

१. अध्ययन क्षेत्रातील चारही गावात सर्वच स्तरातील शैक्षणिक मागासलेपण भिल्ल जमातीत आढळून आले आहे.

२. भिल्ल सर्वाधिक जास्त शैक्षणिक गळतीचे प्रमाण प्राथमिक स्तरावर आहे आणि त्यानंतर माध्यमिक स्तरावर आहे.

३. भिल्ल जमातीत उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या उत्तरदात्यांच्या पाल्यांची संख्या अत्यल्प आहे.

४. ९२ टक्के कुटुंबात एकही पाल्य उच्च शिक्षित नाही.



Scanned with CamScanner

५. शालेय शिक्षणातील प्रवेशित विदयार्थ्यांच्या स्थितीवरून भिल्ल जमातीची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नाही.

६. शिक्षण प्राप्त करण्या योग्य वय असलेल्या मुलांपैकी जमातीत ५६ टक्के मुलेच शालेय शिक्षण प्राप्त करीत आहेत.

७. भिल्ल जमातीत शाळाबाहय मुलांची समस्या आहे.

८. शालेय शिक्षणातील प्रवेशित विदयार्थ्यांची मर्यादीत संख्या भिल्लांच्या शैक्षणिक प्रगतीतील मोठा अडथळा आहे.

### ❖ शिफारशी किंवा सूचना

१. आदिवासी बहुल भागात नवीन शिक्षण संस्था निर्माण करण्याची गरज आहे.

२. शालेय स्तरावरील विदयार्थ्यांचा प्रवेश वाढविण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करून तो शिक्षक व पालक त्यांच्या मार्फत राबविण्याची गरज आहे.

३. भिल्ल जमातीत उच्च शिक्षणाच्या संदर्भात प्रचार—प्रसार करणे गरजेचे आहे.

४. आदिवासी विदयार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी निवासी महाविदयालयाची सुरूवात करण्यात यावी.

### ❖ संदर्भ ग्रंथ

*गिरधारी, बी.व्ही. (२००३). आरसा: आदिवासी जीवन शैलीचा. नाशिक, पूजा कॉम्पूटर्स.*

*लाड, व्ही. (२०००). मराठी विश्वकोष.(खंड—२),(संपादकीय). मुंबई, महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ.*

*जोशी, एम. (१९७५). भारतीय संस्कृती कोष.(संपादकीय). पूणे, भारतीय संस्कृती कोष मंडळ.*

*जाधव, एस. (१९७९). भिल्ल जीवन आणि अविष्कार. पूणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.*

*गारे, जी. (२००१). महाराष्ट्रातील आदिवासी जमाती. पूणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.*

*गाडगीळ, एस. आर., व इतर, (१९८५). नांदेड जिल्हा. मुंबई, महाराष्ट राज्य रौप्य महोत्सवी प्रकाशन.*

*कऱ्हाडे, बी. एम. (२०११). समाजशास्त्रीय संशोधन पद्धती. नागपूर, पिंपळापूरे पब्लिशर्स अॅण्ड कंपनी.*

*जोशी, एम. (१९७५). भारतीय संस्कृती कोष.(संपादकीय). पूणे, भारतीय संस्कृती कोष मंडळ.*

*Naik, T. B. (1969). Impact of Education on the Bhils. New Delhi, Planning Commission .*

*Nambisaan,G. (1983). Educational & Occupational Mobility among the Bhils of Rajasthan. New Delhi, Ph.D Thesis.*



Scanned with CamScanner